

छायाचित्र सौजन्य- Darashiv 2.0

# 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने दुमदुमली नगरीः संत गजानन महाराज पालखीने धाराशिव शहर भक्तीमय

## चार किलोमीटरच्या प्रवासाला लागले सहा तास; पालखी दर्शनासाठी दिवसभर भाविकांची अलोट गर्दी

आरंभ मराठी । धाराशिव

**विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील श्री संत गजानन महाराजांचा पायी पालखी सोहळा बुधवारी सकाळी धाराशिव शहरात दाखल होताच संपूर्ण शहर 'गण गण गणात बोते' या जयघोषाने दुमदुमून गेले. शहरातील विविध चौकांमध्ये आकर्षक रांगोळ्या, फुलांची सजावट आणि उत्स्फूर्त स्वागताची तयारी करण्यात आली होती. भाविकांनी पुष्पवृष्टी करत पालखीचे दर्शन घेतले, तर वारकऱ्यांच्या हरिनामाच्या गजराने धाराशिवचे वातावरण भक्तिमय झाले.**



### ७०० वारकऱ्यांचा शिस्तबद्ध सहभाग

पालखी सोहळ्यात सुमारे ७०० वारकरी सहभागी झाले होते. यामध्ये २५० पताकाधारी, २५० टाळकरी, २०० सेवेकरी तसेच एक अश्व सहभागी होता. पांढरी शुभ्र वेशभूषा, डोक्यावर तुळशीचे रोप आणि मुखी हरिनामाचा अखंड गजर करीत वारकरी विठ्ठलनामात तल्लीन झाले होते. 'गण गण गणात बोते' आणि विठ्ठल नामाच्या जयघोषाने संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले.

### रस्त्यांच्या खोदकामामुळे वारकरी व भाविकांची गैरसोय

शहरातील सुरू असलेल्या रस्त्यांच्या खोदकामाचा फटका पालखी सोहळ्यालाही बसला. मुक्कामस्थळ असलेल्या जिल्हा परिषद कन्या प्रशालेसमोरील एक मार्ग खोदून ठेवण्यात आल्याने वाहतूक एकाच मार्गावर सुरू होती. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. पार्किंगची अपुरी व्यवस्था आणि रस्त्यांच्या कामांमुळे बाहेरगावाहून आलेल्या भाविकांनाही गैरसोयीचा सामना करावा लागला.

>> उर्वरित पान २

## सिंदफळ उड्डाणपुलाच्या संथ कामामुळे अपघातांत वाढ

**तुळजापूर** :- तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ येथे धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलाचे काम गेल्या दीड वर्षांपासून संथ गतीने सुरू असल्याने वाहनधारकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. अपूर्ण काम, खराब सर्व्हिस रोड आणि वाढते अपघात यामुळे नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने काम पूर्ण करावे, अशी मागणी जोर धरत आहे. लातूर बायपाससाठी सिंदफळ शिवारात उभारण्यात येणाऱ्या या उड्डाणपुलाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. त्यामुळे या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या हजारो वाहनधारकांना वाहतूक कोंडी, धुळीचा त्रास आणि अपघातांचा धोका पत्करावा लागत आहे. उड्डाणपुलाचे काम संथ गतीने सुरू असल्यामुळे या परिसरात वारंवार अपघात घडत आहेत. विशेषतः सर्व्हिस रोडवर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना खड्डे चुकवत प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने अपघाताचा धोका आणखी वाढला आहे. गेल्या दीड वर्षांपासून काम सुरू असतानाही मोठा भाग अद्याप अपूर्ण असल्याने वाहनधारकांना आणखी काही काळ त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या कामाला गती देऊन लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच प्रशासनाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून कामाचा वेग वाढवावा आणि लोकप्रतिनिधींनीही याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा वाहनधारकांनी व्यक्त केली आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे खासदार ओमराजे निंबाळकर यांची मागणी

## ३६ महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना पीक विमा मिळावा

आरंभ मराठी । धाराशिव

खरीप २०२५ हंगामातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेत तांत्रिक कारणामुळे वगळण्यात आलेल्या धाराशिव लोकसभा मतदारसंघातील ३६ महसूल मंडळांचा समावेश करून पात्र शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई द्यावी, अशी मागणी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. राज्य तांत्रिक सल्लागार समिती (एसटीएसी) च्या अहवालात तांत्रिक त्रुटीची नोंद करण्यात आली असून, राज्य शासनानेही ही बाब मान्य केली आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांना सात दिवसांत पीक विम्याची रक्कम अदा करण्याचे निर्देश विमा कंपन्यांना देण्यात आले आहेत. मात्र, धाराशिव लोकसभा मतदारसंघातील ३६ महसूल मंडळांतील हजारो शेतकरी अद्यापही या लाभापासून वंचित असल्याकडे खासदार निंबाळकर यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले आहे. धाराशिव जिल्ह्यातील १४, सोलापूर जिल्ह्यातील ११ आणि लातूर जिल्ह्यातील ११ अशा एकूण ३६ महसूल मंडळांचा प्रधानमंत्री पीक विमा योजनेत समावेश करून पात्र शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तांत्रिक कारणामुळे एकही पात्र शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहू नये, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केली आहे.

दैनिक आरंभ मराठी

### धाराशिव ग्रामीण व स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई; पुण्यातून आरोपी जेरबंद

## प्रेमसंबंधातून पतीच्या खुनाचा कट; पत्नीसह तिघांना अटक

आरंभ मराठी । धाराशिव

येडशीजवळील कुमाळवाडी शिवारात आढळून आलेल्या संतोष उर्फ दगडू बाबासाहेब देशमुख (वय ४०, रा. येडशी) यांच्या खुनाचा उलगडा धाराशिव ग्रामीण पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासांत केला आहे. मयताच्या पत्नीचे संशयितासोबत असलेल्या अनैतिक प्रेमसंबंधातून हा खून झाल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, पत्नीसह तीन जणांना अटक करण्यात आली आहे.

दिनांक १३ जुलै रोजी सकाळी कुमाळवाडी शिवारात एका पुरुषाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची माहिती धाराशिव ग्रामीण पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक हाके, पोलीस उपनिरीक्षक संदीप ओव्हाळ व पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाजवळ उभी असलेली हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल तपासल्यानंतर मृताची ओळख संतोष उर्फ दगडू देशमुख अशी पटली. घटनेची माहिती पोलीस अधीक्षक रितू खरोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राऊत यांना देण्यात आली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या पथकासह संयुक्त तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान मयताची पत्नी दैवशाला हिचे बालाजी महादेव पायघन (रा. पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर) याच्यासोबत अनैतिक संबंध असल्याची माहिती समोर आली. आरोपी बालाजी पुण्याकडे पळाल्याचे समजल्यानंतर पुणे पोलिसांच्या मदतीने त्याला आणि त्याचा साथीदार सोमनाथ सातनाक याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत दैवशाला देशमुख हिने दिलेल्या सांगण्यावरून बालाजी पायघन आणि सोमनाथ सातनाक यांनी संतोष देशमुख यांचा चाकूने वार करून व दगडाने ठेचून खून केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी बालाजी पायघन, सोमनाथ सातनाक आणि दैवशाला संतोष देशमुख या तिघांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी मयताचा भाऊ अजित बाबासाहेब देशमुख (रा. येडशी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खरोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने केली.

## रिअल डेस्क व ग्रो इंडिया अ‍ॅपच्या नावाखाली ११.४६ लाखांची ऑनलाइन फसवणूक

**धाराशिव** :- जास्त परताव्याचे आमिष दाखवून ऑनलाइन गुंतवणुकीच्या नावाखाली धाराशिव तालुक्यातील एका व्यक्तीची तब्बल ११ लाख ४६ हजार ९५६ रुपयांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनिल विलास भोसले (वय ४७, रा. काजळा, ता. जि. धाराशिव) यांना ३० डिसेंबर २०२५ ते २० मार्च २०२६ या कालावधीत आरोपींनी 'रिअल डेस्क' व 'ग्रो इंडिया' या अ‍ॅपवर गुंतवणूक केल्यास मोठा आर्थिक परतावा मिळेल, असे आमिष दाखवले. त्यानंतर विविध व्यवहारांद्वारे फिर्यादींकडून ११,४६,९५६ रुपये उकळून त्यांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी आरोपी आशीष कुमार, निलेश शर्मा, ऋषभ जोशी, गौतम, रणविजय सिंग, रोहित शर्मा तसेच अन्य संबंधितांविरुद्ध फिर्यादी यांनी १४ जुलै २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव सायबर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३२०, ३२१, ३३५, ३३६, ३४० तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी) व ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गजानन महाराज दिंडीतील वारकऱ्यांना पोलिसांकडून केळी व पाण्याच्या बाटल्यांचे वाटप

**धाराशिव** :- आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री संत गजानन महाराज दिंडीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी धाराशिव पोलीस विभागाच्या मोटार परिवहन विभागाने सेवाभावी उपक्रम राबविला. पोलीस अधिकारी व अंमलदारांनी स्वखर्चातून वारकऱ्यांना केळी व पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करून वारीतील सेवाभावाची परंपरा जपली. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातून लाखो वारकरी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि श्री संत गजानन महाराज यांच्या पालख्यांसह पायी पंढरपूरकडे विठ्ठल दर्शनासाठी मार्गस्थ झाले आहेत. या वारकऱ्यांच्या सेवेसाठी बुधवारी (दि.१५) धाराशिव पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरात हा उपक्रम आयोजित करण्यात आला. पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोटार परिवहन विभागातील पोलीस अधिकारी व अंमलदारांनी स्वतःच्या खर्चातून वारकऱ्यांना केळी व पाण्याच्या बाटल्यांचे वितरण केले. या उपक्रमामुळे वारकऱ्यांनी पोलीस विभागाच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. आषाढी वारीसारख्या धार्मिक सोहळ्यात वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत समाजाप्रती आपली बांधिलकी जपण्याचा प्रयत्न पोलीस विभागाने या उपक्रमातून केला.

# आशिर्वाद देणारा व्यवसाय करा



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५




अवैध दारू साठा जप्त, लाखो रुपयांचा गुटखा जप्त, कोट्यावधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त, शेतामध्ये गांजा पिकवणारा गजाआड, जुगाराच्या क्लबवर धाड, मटक्याच्या अड्ड्यावर धाड, सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या, अधिक पैशाचे आमिष दाखवून लाखो रुपयाला गंडा, फसवून जमीम बळकावली या आणि अशाप्रकारच्या अनेक बातम्या आपण नेहमीच वर्तमानपत्रात वाचत असतो. दररोजच्या वर्तमानपत्रात अशा प्रकारची एक तरी बातमी आपल्याला वाचायला मिळते. विशेष म्हणजे चार वर्षांपूर्वी जेंव्हा देशभर कोरोना होता, कोरोनामुळे संपूर्ण देशात लॉक डाऊन घोषित करण्यात आले होते. संपूर्ण देश कुलूपबंद होता तेंव्हा देखील अशाप्रकारच्या बातम्या वाचायला मिळत होत्या. गुटखा, गांजा यासारख्या अमलीपदार्थांवर राज्यात बंदी आहे. राज्यातील काही जिल्ह्यात दारूवर देखील बंदी आहे मात्र बंदी असतानाही काही महाभाग या बंदीची संधी साधून गुटखा, गांजा बाजारात विकायला आणतात. विशेष म्हणजे हे अमली पदार्थ ब्लॅकने विकली जातात म्हणजे अधिक पैसे देऊन ती विकले जातात. ज्या जिल्ह्यात दारूवर बंदी आहे तिथे देखील ब्लॅकने दारू विकली जाते. काही ठिकाणी पोलीस आणि प्रशासनाचे हात ओले करून बेधडकपणे या पदार्थांची विक्री केली जाते. जुगार मटका यासारखे अवैध धंदे देखील असेच बेधडकपणे सुरू असतात. वरिष्ठांकडून दबाव आल्यास कारवाईचा दिखावा केला जातो, काही दिवसांनी या अवैध व्यवसायांचा पुनश्च हरिओम होतो. कारण संबंधितांनी सोडलेली लाज. केवळ पैसे कमावणे या एकाच उद्देशाने हे महाभाग समाजाचे आरोग्य धोक्यात आणतात. गुटखा खाल्ल्याने दरवर्षी लाखो लोक कर्करोगासारख्या असाध्य रोगाला बळी पडतात. गुटखा खाल्ल्याने कर्करोग होतो हे माहीत असूनही गुटखा बनवणारे गुटखा बनवतात, विकणारे विकतात आणि खाणारे खातात. दारूबंदीचा फक्त फार्स केला जातो. ज्या भागात दारूबंदी आहे त्या भागात तर जास्त दराने दारू विकली जाते. ड्राय डे च्या दिवशीही दारू ब्लॅकने विकली जाते. दारूमुळे लाखो कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. दारूमुळे संसाराची राखरांगोळी होते. दारू पील्यामुळे यकृताचा आजार होतो. त्या आजारात जर घरातील कर्त्या पुरुषाचा मृत्यू झाला तर त्याची लेकरे बाळे उघड्यावर पडतात हे माहीत असूनही लोक दारू पितात कारण त्यांना ती सहज उपलब्ध होते. जुगार आणि मटका खेळून अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी सावकाराकडे जाण्याची वेळ अनेकांवर येते. सावकाराकडून काढलेले कर्ज फेडता न आल्याने काहींनी आत्महत्या केल्या आहेत. मटका जुगारामुळे जमीन जुमला विकण्याची वेळ काहींवर आली आहे. हजारो लोकांचे आयुष्य उध्वस्त करणारे, समाजाच्या आरोग्याची नासाडी करणारे कर्करोगासारख्या असाध्य रोगाचा विळखा घालून मृत्यूसमीप नेणारे उद्योग कोणी करू नये अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असली तरी हे सारे सुरूच आहे याचे कारण हे व्यवसाय करणाऱ्या महाभागांना याचे काही देणेघेणे नाही त्यांना हवाय तो फक्त पैसा. पैशासाठी सर्वकाही ! या उक्तीप्रमाणे हे लोक काम करतात. यांना कोणाच्या संसाराचे देणेघेणे नाही की कोणाच्या आरोग्याचे. यांचा उद्देश केवळ आणि केवळ पैसा कमावणे हाच आहे. आपला पैसा कमावण्याचा व्यवसाय हा कोणाचा तरी संसार उध्वस्त करणारा असेल तर त्या पैशातून आपल्याला समाधान मिळेल का ? याचा विचार संबंधितांनी करावा. ज्यांचा संसार उध्वस्त झालाय, व्यसनांमुळे ज्या घरातील कर्ता पुरुष देवाघरी गेलाय त्या घरातील लोक या लोकांना शिव्याशापच देत असतील. तेंव्हा असा शिव्या शाप मिळणारा व्यवसाय करण्याऐवजी लोकांचे आशीर्वाद मिळतील असा व्यवसाय संबंधितांनी करावा.

# कन्हेरवाडी, ईटकूर, भोगजी येथे आरोग्य उपकेंद्र; मस्सा (खं.) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करा

## अजित पिंगळे यांची आरोग्यमंत्र्यांकडे मागणी

**आरंभ मराठी । मुंबई**

कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी, ईटकूर व भोगजी येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तसेच मस्सा (खं.) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याची मागणी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भातील प्रस्ताव यापूर्वीच शासनाकडे सादर करण्यात आला असून, ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या प्रस्तावास तातडीने मंजुरी देऊन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.कन्हेरवाडी, ईटकूर, भोगजी आणि मस्सा (खं.) परिसरातील नागरिकांना मूलभूत आरोग्य सुविधा, आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार, माता-बाल आरोग्य



सेवा तसेच दैनंदिन वैद्यकीय सेवा गावपातळीवरच उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंतीही पिंगळे यांनी केली. यावेळी धाराशिव जिल्हा परिषद सदस्य अनंत लंगडे आणि पिनू जाधवर उपस्थित होते.

# स्मार्ट मीटर सक्ती व लोडशेडिंगविरोधात आज धाराशिवमध्ये रास्ता रोको

**आरंभ मराठी । धाराशिव**

स्मार्ट मीटरची सक्ती, वारंवार होणारे वीजपुरवठ्यातील खंड, कमी दाबाने होणारा वीजपुरवठा आणि अचानक करण्यात येणाऱ्या लोडशेडिंगच्या निषेधार्थ आज (दि.१६) सकाळी ११ वाजता धाराशिव येथील ताजमहाल टॉकीजजवळील महावितरणच्या सर्कल कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात आमदार कैलास पाटील व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते नंदू राजेनिंबाळकर यांच्या उपस्थितीत नागरिक सहभागी होणार आहेत. आंदोलनकर्त्यांनी महावितरणच्या ढिसाळ कारभाराचा निषेध करत, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी तास व कमी दाबाने मिळणारी वीज, मुंबईहून अचानक दिले जाणारे लोडशेडिंगचे आदेश तसेच स्मार्ट मीटरच्या नावाखाली ग्राहकांवर वाढीव वीजबिलांचा बोजा टाकला जात असल्याचा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर महावितरण प्रशासनाला जाब विचारण्यासाठी आणि नागरिकांच्या विविध मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले असून, सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# एमएचटी-सीईटी गुणवंतांचा श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेजमध्ये गौरव

## पीडब्ल्यू व फेनॉमेनल बॅचच्या विद्यार्थ्यांच्या यशाचा सत्कार



**आरंभ मराठी । धाराशिव**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, धाराशिव संचलित श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात एप्रिल-मे २०२६ मध्ये झालेल्या एमएचटी-सीईटी (PCM/PCB) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. पीडब्ल्यू (PW) व फेनॉमेनल बॅचच्या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी फेनॉमेनल बॅच प्रमुख शरद सदाफुले यांनी प्रास्ताविक केले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांच्या वतीने कुमारी रेवती किसन जावळे, कुमारी जान्हवी राघवेंद्र कोकिळ आणि कुमारी भार्गवी श्रीकांत माने यांनी मनोगत व्यक्त करत संस्था, शिक्षक आणि पालकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. उपप्राचार्य संतोष घार्गे यांनी नीट, जेईई आणि एमएचटी-सीईटी या विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षा असून फिजिक्स वाला (PW) व फेनॉमेनलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची प्रभावी तयारी केली जाते, असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य नंदकुमार नन्नवरे यांनी विद्यार्थ्यांना जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रमांच्या बळावर ध्येय गाठण्याचा संदेश दिला. या कार्यक्रमास फिजिक्स वाला विभाग प्रमुख अरविंद भगत, कला-वाणिज्य पर्यवेक्षक कैलास कोरके, विज्ञान विभाग पर्यवेक्षक मोहन शिंदे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, सरचिटणीस प्रेमाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ. मंजुळाताई पाटील यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन तेली यांनी मानले.

# ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झालेल्या मुख्याध्यापक गुलाब सय्यद यांचा नागरी सत्कार

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

राजीव गांधी विद्यालय, हंगरगा (नळ) येथील मुख्याध्यापक गुलाब सय्यद हे ३३ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल नळदुर्ग येथील बाळासाहेब ठाकरे नगरातील नागरिकांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव करण्यात आला. गुलाब सय्यद यांनी १९९२ साली शिक्षण महर्षी सिद्रामप्पा आलूरे गुरुजी यांच्या शैक्षणिक संस्थेअंतर्गत खुदावाडी येथे शिक्षक म्हणून सेवेला प्रारंभ केला. त्यानंतर होर्टी येथे तब्बल १२ वर्षे शिक्षक म्हणून कार्य केले. पुढे अणदूर येथील जवाहर विद्यालयात साडेतीन वर्षे अध्यापनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर हंगरगा (नळ) येथील राजीव गांधी विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून कार्यरत राहिले. मुख्याध्यापक म्हणून कार्य करताना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक गुणवत्ता वाढ आणि शिस्तबद्ध शिक्षण व्यवस्थेला त्यांनी विशेष प्राधान्य दिले. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय आणि विद्यार्थीकेंद्री कार्यशैलीमुळे त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली. यावेळी निवृत्त शिक्षक गोपीनाथ माने व निवृत्त नेत्रचिकित्सक डॉ. आनंद काटकर यांच्या हस्ते गुलाब सय्यद यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास अनिल करपे, दत्तात्रय माने, दाऊद नदाफ, डॉ. आनंद काटकर, गोपीनाथ माने, अशोक लोहार, भगवंत सुरवसे, अजय देशपांडे यांच्यासह बाळासाहेब ठाकरे नगरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उगवण न झालेल्या बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

## डॉ प्रतापसिंह पाटील यांच्याकडून नुकसानभरपाईची मागणी

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी अधिकृत विक्री केंद्रातून खरेदी केलेल्या बियाण्यांची अपेक्षित उगवण न झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी अधिकृत बियाणे



विक्री केंद्रातून बियाणे खरेदी करून पेरणी केली. मात्र संबंधित बियाण्यांची अपेक्षित उगवण न झाल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले असून मोठा आर्थिक फटका बसला आहे. अनेक शेतकऱ्यांकडे बियाण्यांच्या रिकाम्या पिशव्या तसेच खरेदीच्या पावत्या उपलब्ध असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित बियाण्यांची तातडीने चौकशी करण्यात यावी, प्रभावित शेतांमध्ये पंचनामे करून दोषी कंपन्या किंवा संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि बाधित शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी बाजारात विक्री होणाऱ्या बियाण्यांच्या गुणवत्तेची कठोर तपासणी करण्यात यावी, जेणेकरून शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

# महाआरोग्य व रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## 700 रुग्णांची तपासणी; 60 जणांचे रक्तदान

**नळदुर्ग** :- पवित्र मोहरम महिन्यानिमित्त नळदुर्ग येथील पांचपीर स्पोर्ट्स असोसिएशन व सोलापूरच्या सिद्धेश्वर रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाआरोग्य व रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात 700 रुग्णांची विविध आजारांची तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले, तर 60 रक्तदात्यांनी रक्तदान केले. माजी नगराध्यक्ष शहेबाज काझी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिराचे उद्घाटन नायब तहसीलदार मनीषा कोळगे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते. यावेळी अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, नगरसेवक, विविध मान्यवर व वैद्यकीय



अधिकारी उपस्थित होते. शिबिरात मूत्रपिंड, हृदयरोग, स्त्रीरोग, मधुमेह, थायरॉईड, अस्थिरोग, मेंदूविकार आदी आजारांवर सोलापूर येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून मोफत औषधे दिली. तसेच शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाच्या वतीने नेत्रतपासणी, चष्मे वाटप करण्यात आले असून मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. रक्तदान शिबिरात 60 रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तसंकलनाची जबाबदारी सिद्धेश्वर रक्तपेढीने पार पाडली. महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर एकत्रित आयोजित करण्याचा हा पहिलाच उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी पांचपीर स्पोर्ट्स असोसिएशनच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# 1950 टोल-फ्री हेल्पलाईनद्वारे मतदारांना मिळणार तातडीची मदत

## मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षणासाठी जिल्हा प्रशासनाचा मदत कक्ष कार्यान्वित

**आरंभ मराठी । धाराशिव**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू असून, या मोहिमेदरम्यान मतदारांना निवडणूकविषयक सेवा अधिक सुलभ आणि प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा निवडणूक प्रशासनाने जिल्हास्तरावर विशेष मदत कक्ष सुरू केला आहे. तसेच मतदारांच्या शंका, अडचणी व तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी '१९५०' हा टोल-फ्री हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. या मदत कक्षामार्फत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक, मतदार म्हणून पात्रता, नाव नोंदणी अथवा दुरुस्तीसाठी आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच २००२, २००४ आणि २००५ च्या विशेष पुनरिक्षणातील मतदार नोंदी शोधण्यासाठीही सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. याशिवाय, गणना प्रपत्र ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने भरताना मतदारांना आवश्यक मार्गदर्शन केले जाणार आहे. स्थलांतरित मतदारांना त्यांचा सध्याचा व पूर्वीचा विधानसभा मतदारसंघ ओळखून योग्य ठिकाणी नावनोंदणी करण्यासाठीही मदत केली जाणार आहे. मतदारांना निवडणूक आयोगाच्या ECInet मोबाईल ॲपची माहिती देण्यात येणार असून, त्यातील 'Book a Call with BLO' या सुविधेचाही वापर कसा करायचा याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या सुविधेद्वारे संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याशी थेट संपर्क साधून आवश्यक माहिती व सहाय्य मिळविता येणार आहे.

पेज 1 वरुन

# गण गण गणात बोते'च्या जयघोषात संत गजानन महाराज पालखीचे धाराशिवमध्ये जल्लोषात स्वागत

मंगळवारी उपळे येथे मुक्काम करून पालखी पहाटे धाराशिवकडे रवाना झाली. सकाळी साडेसातच्या सुमारास शहरात आगमन होताच छत्रपती शाहू महाराज चौकात पालखीचे पहिल्यांदा स्वागत करण्यात आले. त्यानंतर पालखी संत ज्ञानेश्वर मंदिरात काही काळ विसावली. येथे ज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन घेऊन वारकऱ्यांनी अल्पोपहार केला. पुढे शहरातील विविध चौकांत नागरिकांनी पालखीवर पुष्पवृष्टी करत दर्शन घेतले. महात्मा बसवेश्वर चौक, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत परिसर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोरही पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांसह पालखीचे पूजन करून दर्शन घेतले. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदाळकर, अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार जाधव तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पालखी मार्गावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पालखी मार्गावरील वाहतूक काही काळ बंद ठेवण्यात आल्याने शहरातील पर्यायी मार्गांवर वाहतूक कोंडी झाली. मात्र भाविकांनी संयम राखत दर्शनाचा लाभ घेतला. यंदा पालखीचा मुक्काम नेहमीप्रमाणे लेडीज क्लब मैदानावर न होता जिल्हा परिषद कन्या प्रशालेत ठेवण्यात आला. दुपारी तीनच्या सुमारास पालखी मुक्कामस्थळी पोहोचली. आरतीनंतर शहरासह ग्रामीण भागातून आलेल्या हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची रांग कायम होती. गुरुवारी सकाळी पालखी तुळजापूरकडे प्रस्थान करणार असून तेथे मुक्काम होणार आहे.

## चार किलोमीटरच्या प्रवासाला लागले तब्बल सहा तास

सकाळी साडेसात वाजता शहरात दाखल झालेली पालखी दुपारी तीन वाजता मुक्कामस्थळी पोहोचली. अवघ्या चार किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी तब्बल सहा तास लागले. प्रत्येक चौकात स्वागत, पुष्पवृष्टी, आरती आणि दर्शनासाठी मोठी गर्दी होत असल्याने पालखीचा वेग अत्यंत संथ झाला. भाविकांचा उत्साह आणि भक्तिभावामुळे प्रत्येक ठिकाणी पालखी काही काळ थांबत होती.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
» पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

# येडशी-टेंभुर्णी चौपदरीकरणाला तीन महिन्यांत मंजुरी, त्यानंतर तातडीने निविदा प्रक्रिया

## आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार राजाभाऊ राऊत यांच्या मागणीला यश

## येडशीतील 'वन टाइम इम्प्रूव्हमेंट' विकासकामांनाही हिरवा कंदील

आरंभ मराठी । नवी दिल्ली

येडशी–बार्शी–कुर्डुवाडी–टेंभुर्णी या महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवालाला (डीपीआर) पुढील तीन महिन्यांत मंजुरी देण्यात येईल. त्यानंतर तातडीने निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाईल, अशी ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची बुधवारी आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि आमदार राजाभाऊ राऊत यांनी भेट घेऊन येडशी–बार्शी–कुर्डुवाडी–टेंभुर्णी मार्गाच्या चौपदरीकरणासंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले.

या मार्गाच्या डीपीआरला तातडीने मंजुरी देऊन प्रशासकीय मान्यता द्यावी, आवश्यक निधी उपलब्ध करून कामाला लवकर प्रारंभ करावा, अशी मागणी त्यांनी केली. धाराशिव जिल्हा हा मराठवाड्याचे प्रवेशद्वार असून तुळजाभवानी मंदिरामुळे राज्यातील प्रमुख धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून ओळखला जातो. तसेच आकांक्षित जिल्हा म्हणून विविध विकास प्रकल्पांना गती मिळत असल्याने सक्षम दळणवळण व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. टेंभुर्णी–लातूर हा मार्ग पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि कर्नाटकला जोडणारा महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग आहे.



टेंभुर्णी, कुर्डुवाडी, बार्शी, धाराशिव आणि लातूर या शहरांमधील वाढती वाहतूक तसेच कृषी व औद्योगिक विकास लक्षात घेता या मार्गाचे चौपदरीकरण अत्यावश्यक असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील व आमदार राजाभाऊ राऊत यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. येडशी–लातूर या टप्प्याचे काम सुरू असले तरी टेंभुर्णी ते येडशी या उर्वरित भागाचेही तातडीने चौपदरीकरण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एनएच-५४८-सी अंतर्गत टेंभुर्णी–कुर्डुवाडी–बार्शी–कुसळंब तसेच एनएच-६३ अंतर्गत कुसळंब–येडशी या मार्गाच्या चौपदरीकरणासाठीचा डीपीआर पुढील तीन महिन्यांत मंजूर करण्यात येईल. त्यानंतर त्वरित निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष काम सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही दिल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. या निर्णयामुळे धाराशिव, सोलापूर आणि लातूर जिल्ह्यांतील नागरिकांना सुरक्षित व जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असून व्यापार, उद्योग, शेती, धार्मिक पर्यटन तसेच प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

### येडशीतील विकासकामांनाही मंजुरी

महामार्गावरील प्रमुख गाव असलेल्या येडशी येथे 'वन टाइम इम्प्रूव्हमेंट' योजनेअंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्ते, नाली, स्ट्रीट लाईट आदी मूलभूत सुविधा विकसित करण्याचा निर्णयही घेण्यात आल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. ही विकासकामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित रस्ते राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## विविध वृत्त

### स्वाधिकारी संतोष भेंकी यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा; विद्यालयाला 20 आंब्यांची रोपे भेट



आरंभ मराठी । तुळजापूर

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे लेखाधिकारी संतोष भेंकी यांचा वाढदिवस तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तुळजापूर येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करून उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैजनाथ घोडके यांनी संतोष भेंकी यांना आंब्याचे रोप भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच संतोष भेंकी यांनी विद्यालयातील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत विद्यालयाला २० आंब्यांची रोपे भेट दिली. कार्यक्रमास विद्यालयाचे शिक्षण निदेशक सोनकांबळे, दिलीप सलगर, रोहित घोडके, सचिन क्षीरसागर तसेच इयत्ता सहावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाचे महत्त्व रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत उपस्थितांनी वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला.

### छत्रपती संभाजीनगर येथे संस्कार भारती देवगिरी प्रांताची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात



आरंभ मराठी । तुळजापूर

छत्रपती संभाजीनगर येथे संस्कार भारती देवगिरी प्रांताची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. यावेळी उद्‌घाटक म्हणून बोलताना इतिहास संशोधक लक्ष्मीकांत धोंड यांनी मराठवाडा व खानदेशाचा समृद्ध ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी संस्कार भारतीने देवगिरी प्रांताच्या इतिहासाचे दोन ग्रंथांद्वारे संकलन करण्याचा पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रा. स्नेहलता पाठक होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक अनिल भालेराव आणि महामंत्री डॉ. जगदीश देशमुख उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमासह विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. मागील वर्षाच्या इतिवृत्तास व वार्षिक खर्चास मंजुरी देण्यात आली. तसेच कला, संस्कृती आणि संघटन विस्तारासाठी युवक व महिलांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रांत व संभाजीनगर समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### महावितरणच्या माडज विभागात बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना निरोप; नवागतांचे स्वागत



आरंभ मराठी । नारंगवाडी

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे महावितरणच्या माडज विभागातील बदली झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा निरोप समारंभ तसेच नव्याने रुजू झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेकुलवड उपकार्यकारी अभियंता, उमरगा उपविभाग, उपस्थित होते. यावेळी कनिष्ठ अभियंता ए. एस. सय्यद, वरिष्ठ तंत्रज्ञ गुणवंत कांबळे, यंत्रचालक शिवप्पा माळी व वरिष्ठ यंत्रचालक ई. आर. सुतार यांचा सत्कार करून भावपूर्ण निरोप देण्यात आला. ए. एस. सय्यद यांनी ग्राहकांच्या तक्रारींचे तत्परतेने निराकरण करून दिलेल्या सेवाभावी कार्याचा उपस्थितांनी विशेष गौरव केला. तसेच नव्याने रुजू झालेले कनिष्ठ अभियंता एस. एस. साळुंखे, वरिष्ठ यंत्रचालक एम. एस. बुरंगे, वरिष्ठ तंत्रज्ञ एम. व्ही. पाटील आणि यंत्रचालक एम. आर. रूपनवर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी नव्या अधिकाऱ्यांनीही ग्राहकाभिमुख सेवा देत विभागाच्या प्रगतीसाठी कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महावितरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### चिंचोली भुयारला स्वतंत्र आरोग्य उपकेंद्राचे आश्वासन

#### उषाताई गायकवाड यांची प्रत्यक्ष पाहणी

आरंभ मराठी । मुरुम

उमरगा तालुक्यातील चिंचोली भुयार येथील ग्रामस्थांना दर्जेदार व वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी गावात स्वतंत्र आरोग्य उपकेंद्र सुरू करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन गायकवाड यांनी ग्रामपंचायतीमार्फत जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती उषाताई गायकवाड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. या मागणीची गांभीर्याने दखल घेत उषाताई गायकवाड यांनी चिंचोली भुयार येथे प्रत्यक्ष भेट देऊन आरोग्य सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत आरोग्य सेवांबाबतच्या अडचणी जाणून घेतल्या. गावातील वाढती लोकसंख्या आणि आरोग्य सेवेची वाढती गरज लक्षात घेता स्वतंत्र व सुसज्ज आरोग्य उपकेंद्रासाठी नवीन इमारत उभारण्याचे विशेष प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. गावात स्वतंत्र आरोग्य उपकेंद्र उभारण्यात आल्यास ग्रामस्थांना प्राथमिक उपचार, माता-बाल आरोग्य सेवा, लसीकरण तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ गावातच उपलब्ध होणार असून उपचारासाठी बाहेर जाण्याची गरज कमी होणार आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय दूर होऊन ग्रामीण आरोग्य सेवेला बळ मिळणार आहे. यावेळी उपसरपंच रणजित गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सचिन गायकवाड, प्रसाद पाटील तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. चिंचोली भुयार येथील आरोग्य उपकेंद्राचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## सावरगाव शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अतुल पवार, उपाध्यक्षपदी सोनाली शिंदे यांची निवड

आरंभ मराठी । तुळजापूर

तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला, सावरगाव येथील शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अतुल लक्ष्मण पवार यांची, तर उपाध्यक्षपदी सोनाली सुनील शिंदे यांची गुप्त मतदानाद्वारे निवड करण्यात आली. जिल्हा परिषद प्रशाला सावरगाव येथे शनिवारी (दि.११) १७ सदस्यांची नवीन शाळा व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली होती. या समितीची पहिली बैठक मंगळवारी (दि.१४) पार पडली. बैठकीत गुप्त मतदान पद्धतीने अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड करण्यात आली. त्यामध्ये अतुल पवार यांची अध्यक्ष,




तर सोनाली शिंदे यांची उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. बैठकीस नवनिर्वाचित सदस्य पूजा सत्यवान काळदाते, मीरा दत्तात्रय मोरे, ज्योती हनुमंत राऊत, आशाराणी विशाल माळी, महादेवी बाबुशा तोडकरी, पल्लवी समाधान कदम, संध्या बालाजी फंड, योगेश अंकुश काळदाते, गोकुळ हरिदास शिंदे, अहमद इलाही शेख, चंद्रकांत अंबादास धडके, अच्युत नामदेव राऊत, कानिफनाथ बब्रुवान माळी, श्रीशैल्य मल्लिकार्जुन लिंगफोडे व लक्ष्मण भुजंग डोके उपस्थित होते. नवनियुक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व सदस्यांचा शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक रमाकांत गुरव, दादासाहेब काडगावकर, माध्यमिक शिक्षक शुभकिरण मोहिते, क्रीडा शिक्षक रंगनाथ डोलारे यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

## दाळींबमध्ये मुस्लिम बांधवांच्या वतीने पावसासाठी तीन दिवस सामुहिक नमाजपठण

**दाळींब,**:- उमरगा तालुक्यातील दाळींब व परिसरात अनेक दिवसापासून पावसाने ओढ दिली असून शेतकऱ्यांनी शेतीची खरीप पेरणीपूर्व मशागतीची तयारी पूर्ण केली. मात्र, पेरणीयोग्य दमदार पाऊसच झाला नाही. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला असून, त्यामुळे पेरण्या लंबल्या आहेत.अडचणीत सापडलेल्या जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी राजा ढगाकडे डोळे लावून बसला आहे. पावसाच्या दीर्घ विश्रांतीमुळे बळीराजामध्ये चिंतेचे वातावरण आहे.त्यामुळे पावसाला प्रसन्न करण्यासाठी दिनांक 14,15,16 वार मंगळवार,बुधवार,गुरुवारपर्यंत सतत तीन दिवस दाळींब येथील ईदगाह मैदानावर मोठ्या संख्येने मुस्लिम समाज बांधवानी शांत व धार्मिक वातावरणात नमाज-ए-इस्तीस्का करण्याचा उपक्रम हाती घेतला असून अल्लाहकडे चांगला पाऊस पडावा म्हणून प्रार्थना केली जात आहे. या विशेष आयोजित नमाजमध्ये गावातील शेकडो मुस्लिम बांधव पुढाकार घेऊन सहभाग नोंदवत आहेत. नमाजनंतर इमाम यांनी संपूर्ण देशात शांतता नांदावी,शेतकरी सुखी व्हावा,चांगला पाऊस पडावा आणि सर्व लोकांच्या सुरक्षेसाठी विशेष प्रार्थना केली. उपस्थितांनीही हात वर करून अल्लाहकडून पावसासाठी प्रार्थना केली. ईदगाह कमिटी दाळींबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या तीन दिवसीय विशेष नमाजसाठी गावातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत.

## पक्षांतरबंदी कायद्यात व्यापक सुधारणांची मागणी

### जनादेशाचे संरक्षण करण्यासाठी ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनचे निवेदन

आरंभ मराठी । मुरुम

भारतीय राज्यघटनेतील दहाव्या अनुसूचीअंतर्गत असलेल्या पक्षांतरबंदी कायद्यात व्यापक सुधारणा करून मतदारांच्या जनादेशाचे प्रभावी संरक्षण करावे, अशी मागणी ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशन, उमरगा यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन उपविभागीय अधिकारी, उमरगा यांच्या मार्फत भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय विधी व न्याय मंत्री, भारत निवडणूक आयोग, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, मुख्य सचिव तसेच राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, मतदार हा केवळ उमेदवारालाच नव्हे तर त्याच्या पक्षाची विचारसरणी, जाहीरनामा आणि धोरणांनाही मतदान करत असतो. त्यामुळे निवडणुकीनंतर पक्षांतर करून सत्तेच्या समीकरणात सहभागी होणे म्हणजे मतदारांच्या जनादेशाशी आणि लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी प्रतारणा होय. सध्याच्या पक्षांतरबंदी कायद्यातील त्रुटींमुळे मोठ्या प्रमाणावरील पक्षांतराला अप्रत्यक्ष संरक्षण मिळत असून त्यामुळे जनतेचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास कमी होत असल्याची खंतही निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. फाउंडेशनने पक्ष बदलणाऱ्या आमदार-खासदारांचे सदस्यत्व तात्काळ रद्द करणे,



त्यांना पुन्हा जनतेचा कौल घेणे बंधनकारक करणे, पक्षांतराच्या प्रकरणांचा निर्णय स्वतंत्र न्यायाधिकरण अथवा भारत निवडणूक आयोगाकडे सोपविणे, अशा प्रकरणांचा अंतिम निकाल ३० ते ६० दिवसांत देण्याची सक्ती करणे, पक्षांतर केलेल्या सदस्यांना किमान पाच वर्षे मंत्रीपद किंवा तत्सम राजकीय लाभाच्या पदांपासून दूर ठेवणे, दहाव्या अनुसूचीतील 'दोन तृतीयांश विलिनीकरण' ही तरतूद रद्द करणे, भविष्यात 'राईट टू रिकॉल'चा विचार करणे तसेच जनादेशाचा अपमान करणाऱ्या आर्थिक प्रलोभनांवर आणि लोकप्रतिनिधींच्या खरेदी-विक्रीवर कठोर दंडात्मक तरतुदी करण्याची मागणी केली आहे. या निवेदनावर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. राजू बटगिरे, कार्याध्यक्ष सत्यनारायण जाधव, उपाध्यक्ष व्यंकट उर्फ राजू भालेराव, सचिव किशोर औरादे, सहसचिव करिम शेख यांच्यासह ॲड. शीतल चव्हाण, ॲड. ख्वाजा शेख, ॲड. अर्चना जाधव, प्रदीप चौधरी, ज्योती माने, धानय्या स्वामी, प्रदीप मोरे, कविता साळी, बबीता मदने, किशोर बसगुंड, विजय चितली आदी पदाधिकारी व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दैनिक आरंभ मराठी

## पेन्शन अदालत नियमित घेण्याचा निर्णय

# उमरग्यात ७५ वर्षांवरील सेवानिवृत्तांचा सन्मान

आरंभ मराठी । उमरगा

महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व अधिकारी संघटना (उमरगा) यांच्या वतीने पंचायत समिती सभागृहात १३ व १४ जुलै रोजी आयोजित 'पेन्शन अदालत' तसेच ७५ वर्षांवरील सेवानिवृत्तांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. पंचायत समितीच्या सभापती आकांक्षा चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ सेवानिवृत्तांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला उपसभापती रेखाताई इंगळे, सहाय्यक गटविकास अधिकारी विलास जाधव, जिल्हाध्यक्ष प्रदीप मोकासे तसेच राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकारी उपस्थित होते. १३ जुलै रोजी झालेल्या पेन्शन अदालतीत गटविकास अधिकारी (वर्ग-१) प्रशांतसिंह मरोड यांनी पेन्शनधारकांच्या ११ प्रमुख समस्यांवर चर्चा केली. यातील काही प्रश्न जागेवरच निकाली काढण्यात आले, तर वरिष्ठ स्तरावरील प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी दुपारी १२.३० वाजता



नियमित पेन्शन अदालत घेण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. १४ जुलै रोजी आयोजित सन्मान सोहळ्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ वर्षांवरील ज्येष्ठ पेन्शनरांचा तसेच सन २०२५-२६ मध्ये सेवापूर्ती केलेल्या सेवानिवृत्तांचा गौरव करण्यात आला. तसेच डॉ. मोटे यांनी मरणोत्तर देहदानाचा घेतलेला संकल्पही यावेळी गौरविण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुकाध्यक्ष शाहूराज चव्हाण (अण्णा), सरचिटणीस अशोक स्वामी, कार्याध्यक्ष दयानंद बेळंबकर, कोषाध्यक्ष विजयकुमार पाटील, जिल्हा नेते राजेंद्र पाटील, महिला प्रतिनिधी प्रेमकला व्हंताळकर, रुक्मिणी राठोड, अनुराधा मोहिते, जळकोटे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासतालुक्यातीलसेवानिवृत्तशिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. कमलाकर मोटे यांनी केले, तर नागनाथ बदोले यांनी आभार मानले.

# प्रकरणांचा ढीग, प्रवेशाची घाई.. विद्यार्थ्यांचे कोणाला गांभीर्यच नाही

## जातवैधता प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांची धावपळ; प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढल्याने प्रवेश प्रक्रियेवर संकट

### विद्यार्थी-पालकांची कार्यालयात दमछाक

सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव - बारावी, सीईटी आणि विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला वेग आला असतानाच धाराशिव येथील जातपडताळणी कार्यालयात जातवैधता प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत आहे. त्रुटी पूर्ततेच्या नावाखाली विद्यार्थ्यांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असून प्रलंबित प्रकरणांचा ढीग वाढत आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचा वेळ आणि पालकांचा आर्थिक खर्च वाढत असतानाही संबंधित यंत्रणांमध्ये आवश्यक समन्वय नसल्याची तक्रार केली जात आहे. सीईटी सेलची प्रवेश मुदत आणि जातपडताळणी कार्यालयाची प्रक्रिया यामध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली असून तातडीने कार्यवाहीची मागणी होत आहे.**



बारावीच्या परीक्षा निकालानंतर सीईटीचा निकाल जाहीर झाला असून अभियांत्रिकीसह विधी, व्यवस्थापनशास्त्र तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. कॅप राऊंडसाठी ऑनलाइन नोंदणी करताना विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे जातवैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी धाराशिव येथील जातपडताळणी कार्यालयात विद्यार्थ्यांची आणि पालकांची मोठी गर्दी होत आहे. बुधवारी (दि.१५) सकाळपासूनच कार्यालयाबाहेर विद्यार्थ्यांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेक विद्यार्थी हातात कागदपत्रांचे गठ्ठे घेऊन त्रुटींची पूर्तता करण्यासाठी धावपळ करत होते. काही विद्यार्थी कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यात व्यस्त होते, तर काहीजण वारंवार कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असल्याची व्यथा एकमेकांकडे मांडत होते. शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती तसेच शासकीय भरती प्रक्रियेसाठी जातवैधता प्रमाणपत्र अत्यावश्यक असल्याने विद्यार्थ्यांची चिंता आणखी वाढली आहे. कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलदगतीने सुरू असल्याचा दावा केला आहे. त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे सूचना पाठविण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र प्रत्यक्षात कार्यालयातील गर्दी, वाढलेला ताण आणि संथ कार्यवाहीमुळे विद्यार्थ्यांना समाधानकारक दिलासा मिळताना दिसत नाही.

### कार्यालयात प्रचंड गर्दी

बारावी आणि सीईटीच्या निकालानंतर अभियांत्रिकी व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला वेग आल्याने जातवैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. कागदपत्रांतील अगदी किरकोळ त्रुटींसाठीही ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा-पुन्हा कार्यालयात यावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा मौल्यवान वेळ वाया जात असून पालकांचा प्रवास आणि इतर खर्चही वाढत आहे.

### सीईटीची मुदत आणि जातपडताळणीचा विलंब

एसईबीसी आणि खुल्या प्रवर्गातील प्रवेश प्रक्रियेदरम्यान सीईटी सेल आणि जातपडताळणी कार्यालयाच्या नियमांमध्ये पुरेसा समन्वय नसल्याने विद्यार्थी मध्यभागी भरडला जात आहे. सीईटी सेलकडून प्रवेशासाठी निश्चित मुदत दिली जात असताना जातवैधता प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे. नेमके कोणाच्या सूचनांचे पालन करायचे? असा प्रश्न विद्यार्थी आणि पालक उपस्थित करत आहेत.

### प्रलंबित प्रकरणांचा वाढता ढीग

एप्रिल आणि मे महिन्यात प्राप्त झालेल्या अर्जांपैकी अनेक प्रकरणे केवळ त्रुटी पूर्ततेअभावी अद्याप प्रलंबित आहेत. कार्यालयाकडून काम वेगाने सुरू असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात अनेक अर्जदारांना वारंवार कागदपत्रे सादर करण्यासाठी बोलावले जात आहे. किरकोळ त्रुटी दूर करण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांना दोन ते तीन वेळा कार्यालयात येण्याची वेळ येत असल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली.

### ग्रामीण विद्यार्थ्यांची सर्वाधिक गैरसोय

धाराशिव जिल्ह्यातील कळंब, भूम, तुळजापूर, परंडा, उमरगा, लोहारा आणि इतर तालुक्यांतील विद्यार्थी पहाटेपासून कार्यालयात दाखल होत आहेत. दिवसभर प्रतीक्षा करूनही अनेकांची कामे पूर्ण होत नसल्याने त्यांना पुन्हा येण्यास सांगितले जात आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

### प्रलंबित अर्जांचा निपटारा करण्याची मागणी

विद्यार्थ्यांनी प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करावा, त्रुटींची माहिती एकाचवेळी स्पष्टपणे द्यावी, प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीत अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावेत, ऑनलाइन त्रुटी पूर्ततेची सुविधा उपलब्ध करून द्यावी आणि सीईटी सेल व जातपडताळणी कार्यालय यांच्यात प्रभावी समन्वय साधून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी मागणी केली आहे. प्रवेश प्रक्रियेचा अत्यंत महत्त्वाचा कालावधी सुरू असल्याने प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करणे गरजेचे असल्याची भावना विद्यार्थी आणि पालक व्यक्त करत आहेत.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन



आरंभ मराठी । कळंब

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) कळंब तालुक्याच्या वतीने तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली कळंब तहसीलदार यांना विविध शेतकरी प्रश्नांबाबत निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये प्रमुख दोन मागण्या करण्यात आल्या. शेतकऱ्यांनी अधिकृत विक्री केंद्रातून खरेदी केलेल्या बियाण्यांची अपेक्षित उगवण न झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधित बियाण्यांची तात्काळ चौकशी करून पंचनामा करण्यात यावा, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि बाधित शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.तसेच, पीकविमा योजनेत नव्याने लागू करण्यात आलेल्या जाचक अटी तात्काळ रद्द करून शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणे सुलभ पद्धतीने पीकविमा उपलब्ध करून द्यावा. तसेच अल्प दरात पीकविमा भरता यावा, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी पुढील काळात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष बाळासाहेब कथले, युवक तालुकाध्यक्ष भीमा हगारे, माणिकराव जाधव ,भरत शिंदे ,सलमा सौदागर सुंदर बापू लोमटे, आत्माराम बिक्कड, बळवंत पवार, लक्ष्मण शिंदे, चेतन वाघमारे, विकास यादव,विठ्ठल कोकाटे, अफताब तांबोळी, समाधान वाघमारे,संकेत घोलप पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात गझलकार युवराज नळे यांच्या गझलेचा समावेश



**धाराशिव** :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक धोरण (NEP) अंतर्गत पुनर्रचित अभ्यासक्रमात ज्येष्ठ साहित्यिक व गझलकार युवराज नळे यांच्या गझलेचा समावेश करण्यात आला आहे. महाविद्यालयांतील बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गझलेचा अभ्यास करता येणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू यांच्या मान्यतेनंतर तसेच मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे यांच्या स्वाक्षरीने मंजूर झालेल्या अभ्यासक्रमात युवराज नळे यांच्या गझलेचा समावेश करण्यात आला आहे.धाराशिव जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात युवराज नळे यांचे उल्लेखनीय योगदान आहे. त्यांनी दिल्ली येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणूनही यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली आहे. युवराज नळे यांच्या नावावर आजपर्यंत १३ ग्रंथ प्रकाशित झाले असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवादांमध्ये त्यांचे सहा संशोधन निबंध प्रसिद्ध झाले आहेत. साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना अखिल भारतीय व राज्यस्तरीय मिळून १५ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. सध्या ते अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती संस्थेचे देवगिरी प्रांत संघटनमंत्री म्हणून कार्यरत आहेत.युवराज नळे यांनी आतापर्यंत ६०० हून अधिक गझलांची निर्मिती केली आहे. त्यांच्या गझलेचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झाल्याबद्दल साहित्य, शैक्षणिक व विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# पावसाने ओढ दिल्याने धाराशिव तालुक्यात खरीप पीक संकटात

## स्प्रिंकलरच्या आधारावर पिके वाचविण्याची धडपड



**तेर** :- धाराशिव तालुक्यात यंदा मान्सूनने सुरुवातीपासूनच दडी मारल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. कमी पावसात शेतकऱ्यांनी सोयाबीन, तूर, मूग व उडीदाची पेरणी केली असली तरी गेल्या दोन आठवड्यांपासून पावसाने ओढ दिल्याने कोवळी पिके सुकू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत असून, ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा आहे ते स्प्रिंकलरच्या मदतीने पिके वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत. तेरसह परिसरात यंदाचा खरीप हंगाम गतवर्षीच्या तुलनेत तब्बल महिनाभर उशिराने सुरू झाला. मान्सूनच्या विलंबामुळे आधीच चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना एक-दोन दिवस झालेल्या पावसाने दिलासा मिळाल्यानंतर त्यांनी पुढील पावसाच्या आशेवर पेरण्या पूर्ण केल्या. मात्र त्यानंतर पावसाने पुन्हा दडी मारल्याने अनेक ठिकाणी बियाण्यांची उगवणच झाली नाही. परिणामी काही शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. सध्या तालुक्यात अनेक ठिकाणी पेरलेली पिके करपू लागली असून, स्प्रिंकलर किंवा अन्य सिंचनाची सुविधा असलेले शेतकरी पिकांना पाणी देऊन ती वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र पूर्णपणे पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. यंदा बियाणे, खते, कीडनाशके तसेच ट्रॅक्टर मशागतीचा खर्चही सुमारे २० टक्क्यांनी वाढला आहे. त्यामुळे या परिस्थितीत पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागणार आहे. सध्या धाराशिव तालुक्यातील शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले असून, लवकरात लवकर दमदार पाऊस पडून पिकांना जीवदान मिळावे, अशीच प्रार्थना बळीराजा करत आहे.

# व्यंकटेश महाजन महाविद्यालयात करिअर संसदेचा शपथविधी सोहळा




आरंभ मराठी । धाराशिव

जागतिक कौशल्य दिनानिमित्त येथील तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत करिअर संसदेचा शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि लोकशाही मूल्यांची जोपासना करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास करिअर कट्टा छत्रपती संभाजीनगर विभागाचे माजी विद्यार्थी समन्वयक प्रसाद मंमाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. सचिन महाजन होते. यावेळी जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. विनोदकुमार वायचळ तसेच महाविद्यालय समन्वयक प्रा. अभय शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रभारी प्राचार्य प्रा. सचिन महाजन यांच्या हस्ते कु. वैभवी ठाकर यांना करिअर संसद मुख्यमंत्री, कु. आयेशा अत्तार यांना नियोजन मंत्री, रितेश गायकवाड यांना कायदे व शिस्त पालन मंत्री आणि कु. आयेशा पठाण यांना सूचना व प्रसारण मंत्री पदाची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रा. सचिन महाजन यांनी केला.

# भोसा गावकऱ्यांच्या लढ्याला यश; स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच गावात धावली 'लालपरी'

आरंभ मराठी । कळंब




स्वातंत्र्यानंतर तब्बल अनेक दशकांच्या प्रतीक्षेनंतर अखेर भोसा (ता. कळंब) गावात पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) बस दाखल झाली. राकाँपा (शरदचंद्र पवार पक्ष) कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून, गावकऱ्यांनी 'लालपरी'चे जल्लोषात स्वागत करत ऐतिहासिक क्षणाचा आनंद साजरा केला. गेल्या अनेक वर्षांपासून तेरणा नदीवर पूल नसल्यामुळे भोसा गाव एसटी सेवेपासून वंचित होते. त्यामुळे महामंडळाला बस सेवा सुरू करणे शक्य होत नव्हते. मात्र, नुकताच नदीवरील पूल पूर्ण झाल्यानंतर प्रशासनाच्या सूचनेनुसार रस्त्याच्या साईडपट्ट्या दगड-मुरमाने मजबूत करण्यात आल्या. त्यानंतर बससेवेसाठी मार्ग खुला झाला.या बससेवेचा सर्वाधिक लाभ विद्यार्थ्यांना होणार आहे. गावातील सुमारे ५० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींना गौर येथे माध्यमिक शिक्षणासाठी, तसेच कळंब व धाराशिव येथे उच्च शिक्षणासाठी दररोज अनेक किलोमीटर पायी प्रवास करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात हा प्रवास अत्यंत धोकादायक ठरत होता. वाहतुकीच्या सुविधेअभावी अनेक मुलींना शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येत होती. आता नियमित एसटी सेवा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना सुरक्षित, सुलभ आणि वेळेवर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.बसचे गावात आगमन होताच ग्रामस्थांनी चालक व वाहकांचा पुष्पहार घालून सत्कार केला आणि आगार प्रशासनाचे आभार मानले. ही बससेवा सुरू करण्यासाठी प्रा. तुषार वाघमारे, जिक्राईल पटेल, मुसद्दीक काझी, वाहेद पटेल, राकेश ताकपिरे, चेतन वाघमारे यांच्यासह ग्रामस्थांनी पाठपुरावा केला होता. यावेळी प्रा. तुषार वाघमारे यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल कळंब आगार प्रमुख घोलप यांचे विशेष आभार मानले. त्यांनी सांगितले की, 'ही केवळ बस सेवा नसून भोसा गावाच्या विकासाचा आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उघडलेला नवा मार्ग आहे.

### व्याकरण उपकरणाला भारत सरकारचे पेटंट

# पाणिनींच्या व्याकरणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड

आरंभ मराठी । अणदूर



भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम घडवत संस्कृत व्याकरणाचे अध्ययन अधिक सोपे, आकर्षक आणि अनुभवाधारित करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या 'व्याकरण शिकण्यासाठीच्या ई-इंक उपकरणा'च्या (E-Ink Grammar Device) डिझाईनला भारत सरकारने अधिकृत पेटंट मंजूर केले आहे. अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विभागाचे अभ्यासक व संशोधक डॉ. गुरबसप्पा नीलकंठ करपे, त्यांची मुंबईस्थित ज्येष्ठ भगिनी कल्पना शिवराज माशाळकर आणि त्यांच्या संशोधन समूहाने विकसित केलेल्या या अभिनव उपकरणामुळे संस्कृत शिक्षण क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाची नवी दिशा निर्माण झाली आहे. या संशोधन समूहात सोलापूरचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. मल्लिनाथ शहाबादे तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भूगर्भशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. मंगेश वेदपाठक यांचाही समावेश आहे. हे 'व्याकरण उपकरण' ई-इंक (E-Ink) तंत्रज्ञानावर आधारित स्पर्शसंवेदी शैक्षणिक साधन असून, त्याच्या विविध पृष्ठभागांवर पाणिनींची सूत्रे, रूपरचना-वृक्ष (Morphology Trees), शब्दनिर्मितीची प्रक्रिया आणि निवडक उदाहरणे प्रदर्शित होतात. उपकरण फिरवत विद्यार्थी संस्कृत व्याकरणातील विविध संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेऊ शकतात. त्यामुळे धातुरूपांपासून शब्दनिर्मिती आणि अर्थविकासापर्यंतचा संपूर्ण प्रवास अधिक सहज आणि प्रभावीपणे समजण्यास मदत होते. या उपकरणात एनएफसी (Near Field Communication) तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात आला आहे. विशेष अध्ययन-कार्ड उपकरणाला स्पर्श करताच संबंधित स्तरानुसार संस्कृत धडे, आवश्यक सूत्रे, शब्दसंग्रह आणि रूपरचनात्मक विश्लेषण त्वरित उपलब्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञानपातळीनुसार टप्प्याटप्प्याने अध्ययन करता येते. शाळा, महाविद्यालये, गुरुकुल, संस्कृत विद्यापीठे तसेच स्वयं-अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे उपकरण विशेष उपयुक्त ठरणार आहे. पारंपरिक संस्कृत व्याकरण अध्यापनाला डिजिटल, परस्परसंवादी आणि अनुभवाधारित स्वरूप देण्याची क्षमता या उपकरणात असून, विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत विषयाबद्दलची आवड वाढविण्यासही ते प्रभावी ठरणार आहे. संशोधनाला मिळालेली ही पेटंट मंजुरी भारतीय भाषाविज्ञान, शैक्षणिक तंत्रज्ञान आणि संस्कृत शिक्षण क्षेत्रासाठी महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे. पाणिनींच्या व्याकरणशास्त्राचा आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रभावी वापर करून प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेला जागतिक स्तरावर नव्या स्वरूपात सादर करण्याच्या दिशेने हे संशोधन मोलाचे योगदान देणार असल्याची भावना संशोधकांनी व्यक्त केली आहे.

# तेर परिसरातील रात्रीची सिंगल फेज वीज बंद

## शेतात राहणाऱ्या कुटुंबांच्या जीवितास धोका

आरंभ मराठी । तेर




धाराशिव तालुक्यातील तेर परिसरात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) च्या अनियमित कारभारामुळे शेतात वास्तव्यास असलेल्या शेतकरी कुटुंबांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. रात्री थ्री-फेज वीजपुरवठा बंद झाल्यानंतर उजेडासाठी दिली जाणारी सिंगल फेज वीजही मनमानी पद्धतीने सुरू-बंद केली जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने अनेक शेतकरी कुटुंबे शेतातील घरांमध्ये वास्तव्यास आहेत. रात्रीच्या वेळी सिंगल फेज वीज उपलब्ध नसल्यामुळे परिसरात पूर्ण अंधार पसरतो. त्यामुळे साप, विंचू तसेच इतर वन्य प्राण्यांचा धोका वाढला असून नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. मंगळवारी रात्री बुकनवाडी शिवारातील एका शेतकऱ्याच्या पायाजवळ मोठा साप आल्याची घटना घडली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र या घटनेमुळे परिसरातील शेतकरी भयभीत झाले आहेत. काळ आला होता पण वेळ आली नव्हती, अशी भावना संबंधित शेतकऱ्यांनी व्यक्त केली. रात्रीची सिंगल फेज वीज मनमानी पद्धतीने बंद ठेवण्याऐवजी नियमितपणे सुरू ठेवावी, जेणेकरून शेतात राहणाऱ्या कुटुंबांची सुरक्षितता अबाधित राहील, अशी मागणी तेर परिसरातील शेतकऱ्यांनी महावितरणकडे केली आहे.

शिवकडा देवस्थानाच्या ७/१२ नोंदींवरून वाद

प्रधान पुजारी बाळू स्वामी यांच्या नावाचीच नोंद ठेवण्याची ग्रामस्थांची मागणी

आरंभ मराठी / भूम




भूम तालुक्यातील हाडोंग्री येथील ग्रामदैवत मन्नाथ स्वामी ( महादेव देवळ ) शिवकडा देवस्थानाच्या मालकीच्या इनाम जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कातील वारसांच्या नोंदी रद्द करून, प्रत्यक्ष देवस्थानाची सेवा करणारे प्रधान व ...मेव पुजारी बाळू स्वामी यांच्या नावाचीच सेवेकरी म्हणून नोंद कायम ठेवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे ...ी आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, भूम यांच्यासह विभागीय आयुक्तांकडेही निवेदन देण्यात आले आहे. ...स्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, मागील सुमारे ४० वर्षांपासून बाळू स्वामी हेच शिवकडा देवस्थानात नियमित पूजा-...र्चा, दिवाबत्ती व अन्य धार्मिक विधी पार पाडत आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणताही वारस हाडोंग्री येथे वास्तव्यास ...न देवस्थानाची सेवा करत नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, ...स्थानाशी संबंधित काही सदस्य बाहेरगावी स्थायिक झाले असून काही जण कपिलधार येथे पुजारी म्हणून कार्यरत ...हेत. प्रत्यक्ष देवस्थानाची सेवा न करता त्यांच्या नावांची ७/१२ उताऱ्यावर नोंद करण्यात आल्याने भविष्यात देवस्थानाच्या इनाम जमिनीवर हक्क सांगण्याचा किंवा ती बळकावण्याचा प्रयत्न होऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. संबंधित जमीन ही देवस्थानाची इनाम जमीन असल्याने महसूल अभिलेखात सेवेकरी म्हणून केवळ प्रत्यक्ष सेवा करणाऱ्या पुजाऱ्याच्याच नावाची नोंद असावी, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे. इतर वारसांच्या नोंदी या सनद व प्रचलित नियमांच्या विरोधात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. याशिवाय देवस्थानातील देणग्या, दानपेटीतील निधी, विवाह सोहळ्यांतून मिळणारे उत्पन्न, त्या निधीतून खरेदी करण्यात आलेल्या मालमत्तेची चौकशी, तसेच देवस्थान परिसरातील कथित झाडतोड आणि ट्रस्टच्या कारभाराचीही स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.
७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कातील नोंदी रद्द करून केवळ प्रधान पुजारी बाळू स्वामी यांच्या नावाचीच सेवेकरी म्हणून नोंद कायम ठेवावी आणि संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

अतिक्रमण कारवाईच्या मागणीसाठी आत्मदहनाचा प्रयत्न; पोलिसांच्या सतर्कतेने अनर्थ टळला

तुळजापूर पंचायत समितीत तणाव; गटविकास अधिकाऱ्यांनी १७ जुलैला सुनावणीचे आदेश

आरंभ मराठी | तुळजापूर

काटी ग्रामपंचायत हद्दीतील कथित अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी अनेक महिन्यांपासून पाठपुरावा करूनही प्रशासनाने कारवाई केली नसल्याचा आरोप करत माजी सैनिक आणि अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे तालुकाध्यक्ष श्रीकांत सौदागर गाटे यांनी बुधवारी तुळजापूर पंचायत समिती कार्यालयात अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून त्यांना ताब्यात घेतल्याने मोठा अनर्थ



आरंभ मराठी